मूल्य : ५ रुपये
स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

एप्रिल २०२६

## ₹ ७००+
## कोटींचा संमिश्र व्यवसाय

**स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी**
३१ मार्च २०२६ अखेरची स्थिती

**ठेवी**
₹ ४०८.८८ कोटी

**कर्जवितरण**
₹ ३०२.६५ कोटी

**व्यवसायवृद्धी १८.८१ %**



**'सहकार स्वरूपा'** म्हणजे
कोकणातील सहकाराचे
अनुभवसिद्ध मॉडेल मांडणारे पुस्तक





राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील रत्नागिरीत आले असताना स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली.

भारतीय जनता पक्षाचे समीर तिवरेकर रत्नागिरी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष झाल्याबद्दल ॲड. दीपक पटवर्धन आणि पतसंस्था परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.






संतोष थेराडे यांची जिल्हा परिषद सदस्यपदी निवड झाल्याबद्दल ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यशवंत वाकडे यांची लांजा पंचायत समिती सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ॲड. दीपक पटवर्धन आणि व्यवस्थापक मोहन बापट यांनी अभिनंदन केले.





निवळी (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील कृषीपंढरी या कृषी पर्यटन आणि फार्म स्टे प्रकल्पाचे उद्घाटन ॲड. दीपक पटवर्धन यांच्या हस्ते झाले.

## संपादकीय

# प्रत्येक पैशाच्या पूर्णांशाने वापरातून आर्थिक सौष्ठवाकडे...

आर्थिक वर्षाची समाप्ती अर्थात 'मार्च एंडिंग' जवळ आल्यावर सर्व आर्थिक संस्थांमध्ये मोठ्या लगबगीचं वातावरण असतं. साहजिकच स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थाही त्याला अपवाद नाही; मात्र स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचं वेगळेपण हे आहे, की संपूर्ण वर्षभर कटाक्षाने वेळच्या वेळी, सर्व नियमांना बांधील राहून आणि पारदर्शकपणे कामकाज केलं जात असल्याने शेवटी कसल्याच प्रकारची गडबड होत नाही. गेली अनेक वर्षं संस्था आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशी म्हणजे ३१ मार्चलाच पत्रकार परिषद घेऊन आर्थिक आकडेवारी जाहीर करते. ती परंपरा यंदाही पाळून, संस्थेची भक्कम आर्थिक स्थिती सर्वांपुढे ठेवताना मनाला आनंद झाला. २०२५-२६ या आर्थिक वर्षात स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा संमिश्र व्यवसाय ७०० कोटी रुपयांहून अधिक झाला असून, संस्थेने या आर्थिक वर्षात १८.८१ टक्के व्यवसायवृद्धी नोंदवली आहे.


महाराष्ट्रातल्या पतसंस्था चळवळीला एक वेगळी दिशा देण्याचं काम स्वरूपानंद पतसंस्थेने केलंय, असं मला वाटतं. कोकणातली ही पतसंस्था संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्र व्यापून राहिलेली आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एक ऊर्जावान वातावरण निर्माण होईल, अशा प्रकारची ही आकडेवारी आहे. संस्थेचा आर्थिक पाया सहकार तत्त्वानुरूप वृद्धिंगत होत असतानाच ४९ हजार सभासदांचा हा एकजिनसी समूह झाला आहे. या सामूहिक ऊर्जेतून स्वरूपानंद पतसंस्थेचं अर्थविश्व अग्रेसर होत आहे. संस्थेकडच्या निधीच्या म्हणजेच प्रत्येक पैशाचा पूर्णांशाने उपयोग झाला, तर चांगला नफा होतो, हे संस्थेच्या कामगिरीवरून पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे.

प्रत्येक आर्थिक वर्षाचं आव्हान वेगळं असतं. शेवटच्या तिमाहीत वाढलेलं सोनेतारण कर्ज हा एक वेगळा आयाम होता आणि ते या आर्थिक वर्षाचं आव्हान होतं. अतिरिक्त सोनेतारण कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी त्या पद्धतीने निधी उपलब्ध करणं आवश्यक होतं. हे करत असताना असं लक्षात आलं, की शेवटच्या तीन महिन्यांत कर्जाचा आकडा मोठ्या प्रमाणावर वाढत जातोय. त्याचबरोबर बँकांच्या ठेवींचे कमी होणारे व्याजदर हाही एक महत्त्वाचा मुद्दा होता. त्यामुळे त्यावरही आम्ही लक्ष ठेवून होतो. यामध्ये कर्जवितरणाचा वेग वाढला होता, त्याबरोबरच ठेवी त्या प्रमाणात वाढवणं आवश्यक होतं. गुंतवणुकीवर मिळणारा परतावा लक्षात घेऊन या तिन्ही घटकांमध्ये समन्वय साधणंही आवश्यक होतं. तो समन्वय उत्तमरीत्या राखल्यामुळे प्रत्येक पैशाचा पूर्णांशाने उपयोग झाला. संस्थेची वसुली यंत्रणा उत्तम पद्धतीने कार्यान्वित असतेच. ती याही वर्षी तशीच कार्यरत होती. कर्जदारांचं चांगलं सहकार्य मिळालं आणि वसुली उत्तम राहिली. हाही अत्यंत महत्त्वाचा मुद्दा होता.

कोणत्याही आर्थिक संस्थेला नफेखोरी न करता होणाऱ्या लाभाला महत्त्व असतं. हा लाभ आर्थिक संस्थेची आर्थिक ताकद वाढवत नेतो. त्यामुळे अर्थकारणात नफा होण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यंदा संस्थेने १० कोटी रुपयांहून अधिक निव्वळ नफा प्राप्त केला, ही गोष्ट आनंद देणारी आहे. प्रामुख्याने ४९ हजार सभासदांच्या सहकार्यातून आणि त्यांच्या सहकार्याच्या भावनेतून झालेल्या व्यवहारांतून हा नफा वाढत गेला.

हे संस्थेच्या अर्थकारणाचं यश व्यवस्थापन म्हणून संचालक मंडळाचं आणि प्रशासकीय लोकांचं आहे; पण त्याचबरोबर सभासदांनी या संस्थेवर दाखवलेला विश्वास हे या सगळ्याचं मूळ आहे. त्या विश्वासातून केलेल्या व्यवहारांतून हा सहकार फुललेला आपल्याला पाहायला मिळतो. या सगळ्याचं योग्य वेळेला आणि नियमात राहून प्रकटीकरण करणं हे संस्थेचं दायित्व आहे, याची जाणीव संस्थेने ठेवली. म्हणून प्रति वर्षीप्रमाणेच यंदाही ३१ मार्च रोजी अत्यंत उत्तुंग असे हे आकडे जाहीर करताना मनाला आनंद झाला. ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी असणं, ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्जवितरण असणं, कर्जवसुली ९९ टक्क्यांहून अधिक प्रमाणात असणं आणि त्याचबरोबर १० कोटी रुपयांपेक्षा अधिक निव्वळ नफा प्राप्त होणं ही आकडेवारी संस्थेचं आर्थिक सौष्ठव दर्शवणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या कामगिरीची दखल घेतली असून, शुभेच्छा संदेशही पाठवला आहे.

गेल्या आर्थिक वर्षाची यशस्वी सांगता करतानाच नवीन वर्षाची नवीन प्रेरणा घेऊन कामाला लागण्यासाठी चांगलं वातावरण निर्माण झालं. आता या वर्षी आम्ही ५०० कोटी रुपयांच्या ठेवींचं उद्दिष्ट ठेवून काम करणार आहोत. सर्व सभासदांनी आणि या संस्थेला सहकार्य केलेल्या सर्वांना मनापासून धन्यवाद!



**- ॲड. दीपक म. पटवर्धन**

**वर्ष : १, अंक : १.** RNI No. MHMAR/25/A4199. एप्रिल २०२६. *पाने १६. *किंमत ५ रुपये

'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा' या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक सिद्धिविनायक प्रिंटर्स, कारवांचीवाडी, रत्नागिरी' येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर. **मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स. **संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२. **संपर्क :** (०२३५२) २२१२६३/२९५३६३. **वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com

**Volume : 1, Issue : 1. April 2026**

This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Siddhivinayak Printers, Karwanchiwadi, Ratnagiri and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri – 415612. **Editor :** Adv. Deepak Manohar Patwardhan. **Executive Editor :** Aniket Konkar

# संमिश्र व्यवसाय ७०० कोटींच्या पलीकडे

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने गाठले नवे शिखर; प्रगतीची परंपरा कायम

**रत्नागिरी : नेटकेपणाने, शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने कामकाज करणाऱ्या स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने आपल्या प्रगतीतील सातत्य यंदाही कायम राखले आहे. दर वर्षीप्रमाणे यंदाही आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशी म्हणजे ३१ मार्च २०२६ रोजी संस्थेने आपली आर्थिक आकडेवारी जाहीर केली असून, संस्थेच्या संमिश्र व्यवसायाने यंदा ७०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. राज्य कार्यक्षेत्र असलेल्या स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी वर्षअखेरीच्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**

‘या आर्थिक वर्षात स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला १० कोटी ९४ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, १८.८१ टक्के व्यवसायवृद्धी झाली आहे. पतसंस्थेने ३५ वर्षांत सातत्यपूर्ण व्यवसायवृद्धी करून उत्तम आर्थिक सौष्ठव राखले असल्याने संस्थेची विश्वासार्हता जनमानसावर कोरली गेली आहे,’ असे ॲड. पटवर्धन म्हणाले.

**उत्तम व्यवस्थापन, योग्य विनियोग**

‘२०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेकडे असलेल्या ठेवी ४०८ कोटी ८८ लाख रुपयांच्या झाल्या असून, संस्थेने ३०२ कोटी ६५ लाख रुपयांचे कर्जवितरण केले आहे. अशा रीतीने संमिश्र व्यवसाय ७११ कोटी रुपयांचा झाला असून, संस्थेने १६९ कोटी २९ लाख रुपयांच्या बँक गुंतवणुका केल्या आहेत. गुंतवणुकांमध्ये गेल्या वर्षीपेक्षा १३.३६ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. ठेवींमध्ये ६२ कोटी रुपयांची म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत १८ टक्के वाढ झाली आहे. संस्थेच्या कर्जवितरणामध्ये ५० कोटी रुपयांची म्हणजेच लक्षणीय १९.७९ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. या सगळ्यामुळे संस्थेचे वार्षिक उत्पन्न ४८ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले असून, उत्तम व्यवस्थापन



व उपलब्ध निधीचा योग्य विनियोग केल्याने संस्थेने उत्तम नफा मिळवला आहे,’ असे ॲड. पटवर्धन यांनी नमूद केले.

**निव्वळ नफ्यात सातत्यपूर्ण वाढ**

गेल्या पाच वर्षांत पतसंस्थेच्या नफ्यातही सातत्यपूर्ण वाढ होत आहे. २०२१-२२ मध्ये ६ कोटी २१ लाख, २०२२-२३ मध्ये ६ कोटी ६३ लाख, २०२३-२४ मध्ये ७ कोटी ३ लाख, २०२४-२५ साली ८ कोटी ३२ लाख, तर २०२५-२६ या आर्थिक वर्षात १० कोटी ९४ लाख रुपयांचा निव्वळ नफा पतसंस्थेला झाला आहे. प्राप्त केलेल्या नफ्याचा विनियोग संस्थेने स्वनिधी वाढवण्यासाठी केला आहे. झालेल्या नफ्यातून अत्यावश्यक खर्च करून उर्वरित ५० टक्क्यांपेक्षा जास्त नफा संस्थेने स्वनिधी वाढवण्यासाठी गुंतवून आर्थिक पाया भक्कम केला. त्यामुळे पतसंस्थेचा स्वनिधी आता ५५ कोटी रुपये एवढा झाला आहे.

नफ्याचा विनियोग पाया भक्कम करण्यासाठी

संस्थेच्या नफ्याबद्दल ॲड. पटवर्धन यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, की सहकार क्षेत्रात नफेखोरी करणे अपेक्षित नसते. सहकारी संस्था सर्वांना बरोबर घेऊन चालवणे अपेक्षित असते. ‘एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ’ याच तत्त्वाचा अवलंब करून स्वामी स्वरूपानंद पतसंस्था गेली ३५ वर्षे वाटचाल करतेय. संस्थेकडे उपलब्ध असलेला सर्व निधी योग्य पद्धतीने कार्यान्वित केल्यामुळे, वितरित केल्यामुळे आणि त्याची योग्य पद्धतीने व्यवस्थापन केल्यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढते. वसुली परिपूर्ण केल्यामुळे संस्थेचे व्याजाचे उत्पन्न वाढते. या सगळ्यामुळे संस्थेला सातत्यपूर्ण आणि चांगला नफा होतो. संस्थेला झालेला १० कोटी ९४ लाख रुपयांचा नफा हा निव्वळ नफा आहे. सगळ्या प्रकारचे आवश्यक असणारे खर्च आणि तरतुदी केल्यानंतर जे शिल्लक राहते त्याला निव्वळ नफा म्हणतात. आवश्यक असणारी गंगाजळी, आवश्यक असणाऱ्या लाभांशासाठीची तरतूद, त्याचबरोबर वेगवेगळ्या कारणांसाठीचे निधी गठित करणे वगैरे बाबी यातून केल्या जातात. आजपर्यंत संस्थेने जवळजवळ आपल्या प्रत्येक वर्षाच्या नफ्यातून ५० ते ५५ टक्के रक्कम परत व्यवसायामध्ये गुंतवली. त्यातून पतसंस्थेकडे आता ५५ कोटी रुपये एवढा स्वनिधी निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही संस्थेच्या स्वनिधीमध्ये जेवढी वाढ नसेल, तेवढी वाढ स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या स्वनिधीमध्ये सातत्याने केली जाते, असे पटवर्धन यांनी सांगितले. स्वनिधी संस्थेचे आरोग्य दर्शवतो.

**उत्तम जोखीम व्यवस्थापन**

सीआरएआर (CRAR) म्हणजे भांडवल पर्याप्तता प्रमाण संस्थेने २८.०८ टक्के असे लक्षणीय राखले आहे. असणारे धोके आणि देणी जुळवण्याएवढे स्वभांडवल संस्थेकडे किती प्रमाणात आहे, सीआरएआर दर्शवतो. तो उत्तम असल्याने ठेवीदार, गुंतवणूकदार पूर्ण विश्वास ठेवून संस्थेकडे गुंतवणूक करतात. संस्थेकडे ३१ कोटी रुपयांच्या घरात बचत ठेवी आहेत. बचत ठेवींचे हे प्रमाण अर्थजगतासाठी लक्षणीय आहे. संस्थेच्या एकूण ठेवी ४०८ कोटी ८८ लाख रुपये झाल्या असून, २०२६-२७ या आर्थिक वर्षात त्या ५०० कोटींपर्यंत पोहोचतील या दृष्टीने संस्था प्रयत्नशील राहणार आहे. संस्थेचे कर्ज व्यवहारही ३०० कोटी रुपयांच्या

पलीकडे गेले आहेत. संस्थेच्या आर्थिक शिस्तीच्या संस्कारातून उत्तम व्यवस्थापन व चोखंदळ कर्जव्यवहार धोरण असल्याने व कर्जदारांच्या उत्तम सहकार्यामुळे कर्जवसुली ९९.८२ टक्के अशी विक्रमी राखण्यात संस्था सातत्याने यशस्वी झाली आहे. संस्थेच्या सात शाखांमधील वसुली १०० टक्के झाली असून, अन्य शाखांमध्येही हाताच्या बोटावर मोजण्याइतके कर्जदार वगळता उत्तम वसुली व उत्तम नफा प्राप्त झाला आहे, असेही ॲड. पटवर्धन यांनी नमूद केले.

**४९ हजार सभासदांची सामूहिक ऊर्जा**

संस्थेची सुरुवात झाली, त्या वेळी फक्त ३०० सभासद होते. गेल्या ३५ वर्षांत संस्था प्रचंड लोकाभिमुख पद्धतीने वाढली आणि आजअखेर सभासदांची संख्या ४९ हजार झाली आहे. त्यामध्ये साधारणपणे साडेनऊ हजार ठेवीदार असतील आणि १९ हजार कर्जदार असतील. संस्थेकडे वाढणारी बचत खात्यांची संख्याही महत्त्वाची आहे. जवळपास ३१ कोटी रुपयांहून अधिक रक्कम बचत खात्यांमध्ये आहे. याचा अर्थ एवढ्या मोठ्या प्रमाणावर ग्राहक स्वरूपानंद पतसंस्थेला माध्यम म्हणून वापरत आहेत. पतसंस्थेच्या विश्वासार्हतेमुळे हे साध्य झाले आहे. संस्थेचा आर्थिक पाया सहकार तत्त्वानुरूप वृद्धिंगत होत असतानाच ४९ हजार सभासदांचा हा एकजिनसी समूह झाला आहे. या सभासदांच्या सामूहिक ऊर्जेतून स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थविश्व अग्रेसर होत आहे, असे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले.

**पुढचे उद्दिष्ट ५०० कोटींच्या ठेवींचे**

२०२६-२७ या नवीन आर्थिक वर्षात ठेवींचा ५०० कोटी रुपयांचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट पतसंस्थेने ठेवल्याचे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले. त्या दृष्टीने प्रत्येक शाखेला दर महिन्याला किमान पाच लाख रुपयांच्या ठेवी गोळा करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. तसेच, प्रत्येक शाखेने दरमहा किमान दोन लाख रुपयांचे कर्जवितरण करावे, असेही उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दर वर्षीप्रमाणेच तिन्ही ठेववृद्धी मासांना यंदाही चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास वाटतो. त्यामुळे या आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा ओलांडण्यात अडचण येणार नाही, असे ते म्हणाले. ठेवीदारांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मोठ्या रकमेच्या ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारांच्या प्रातिनिधिक स्वरूपात स्वतः भेटी घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**डिजिटल प्लॅटफॉर्मचाही वापर**

नवीन जमान्यातील डिजिटल प्लॅटफॉर्मचाही वापर स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था चांगल्या प्रकारे करत असल्याचे पटवर्धन यांनी सांगितले. संस्थेने जवळजवळ २६ हजार ट्रान्झॅक्शन्स (आर्थिक व्यवहार) आयटी सेक्टरच्या माध्यमातून केलेले आहेत. त्यामध्ये अन्य बँकेची मदत घेऊन एनईएफटी आणि आरटीजीएस अशा माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर ट्रान्झॅक्शन्स होतात. सुमारे ११७ कोटी रुपयांचे व्यवहार एनईएफटी, आरटीजीएस या माध्यमांतून संस्थेकडून होत आहेत, अशी माहिती पटवर्धन यांनी दिली.

## नवीन चार मजली इमारत

२०२६-२७ या नव्या आर्थिक वर्षात स्वमालकीच्या प्रशस्त चार मजली इमारतीत संस्थेचे प्रधान कार्यालय स्थलांतरित होणार आहे. तसेच, रत्नागिरी बाजारपेठ ही नवी शाखाही तिथे सुरू होणार आहे. हे कार्यालय रत्नागिरी शहरात उभे राहत असून, त्याचे काम ऑक्टोबर महिन्यापर्यंत पूर्ण होणार आहे, असे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले. गेल्या ३५ वर्षांत संस्थेने साधारणतः २६ हजार चौरस फुटांची जागा स्वतःच्या कार्यालयांसाठी खरेदी केली. पतसंस्थेच्या १७ शाखांपैकी १० कार्यालये स्वमालकीच्या जागेत आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.



## मुख्यमंत्र्यांकडून शुभेच्छा संदेश



**मुख्यमंत्री**
**देवेंद्र फडणवीस**


स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा आर्थिक वर्षाचा लेखाजोखा ३१ मार्च रोजी जाहीर केला जातो आणि त्याचा अहवाल अनेक मान्यवरांना पाठवला जातो. यंदा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पतसंस्थेच्या उत्तुंग कामगिरीची दखल घेतली असून, शुभेच्छा संदेश पाठवला आहे. हा सुखद धक्का असल्याची भावना ॲड. पटवर्धन यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे, की 'संस्थेची सातत्यपूर्ण प्रगती समाधानकारक असून, संस्थेने सहकार क्षेत्रात केलेले कार्य प्रेरणादायी आहे. कोकणातील, विशेषतः रत्नागिरीसारख्या भागात सहकार चळवळीच्या माध्यमातून जनसामान्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सहकार चळवळीला बळकटी देऊन नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी संस्थेने उचललेले पाऊल कौतुकास्पद आहे.' पुढील काळातही संस्था अधिक प्रभावीपणे कार्य करून सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण करील, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी संस्थेच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. या शुभेच्छा संदेशामुळे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळणार आहे, असे ॲड. पटवर्धन म्हणाले.


# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी


## ३१ मार्च २०२६ अखेरची आर्थिक स्थिती


| | | |
|---|---|---|
| **एकूण ठेवी**<br>₹ ४०८.८८<br>कोटी | **एकूण कर्ज**<br>₹ ३०२.६५<br>कोटी | **गुंतवणूक**<br>₹ १६९.२९<br>कोटी |
| **निव्वळ नफा**<br>₹ १०.९४<br>कोटी | **खेळते भांडवल**<br>₹ ४८८.६३<br>कोटी | **स्वनिधी**<br>₹ ५४.६४<br>कोटी |
| **वसुलीचे प्रमाण**<br>९९.८२ % | **सी.डी. रेशो**<br>६५.०१ % | **सी.आर.ए.आर.**<br>२८.०८ % |


# २०२० ते २०२६ या कालावधीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची कामगिरी





| आर्थिक वर्ष | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| वसुलीचे प्रमाण (टक्के) | ९९.७५ | ९९.५१ | ९९.६१ | ९९.५३ | ९९.७१ | ९९.८२ |
| सी. डी. रेशो (टक्के) | ६१.९८ | ५९.४७ | ५८.१५ | ५९.९६ | ६३.६६ | ६५.०१ |
| सीआरएआर (टक्के) | | | २७.१९ | २८.०२ | २७.९७ | २८.०८ |

| स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था - ३१.०३.२०२६ अखेर एकत्रित ताळेबंद | | | |
|---|---|---|---|
| **भांडवल व देणी** | **रक्कम** | **जिंदगी व येणी** | **रक्कम** |
| भागभांडवल | २२०७७३००.०० | हाती व बँक शिल्लक | |
| | | हाती शिल्लक | २२०५२८५६.०० |
| निधी | | जनता सहकारी बँक करंट | २०२५६९.२२ |
| मालमत्ता निर्मिती निधी | ६२५००००००.०० | जनता सहकारी बँक बचत | ९२३५६३.९१ |
| गंगाजळी | १७४२२३३३०.५० | बँक ऑफ महाराष्ट्र करंट | ४५५३२६.३७ |
| जनरल फ्री रिझर्व्ह | २५००००००.०० | र.जि.म.स. बँक बचत | ३९६१७.५९ |
| सिल्व्हर ज्युबिली फंड | ३०६९६४.०० | बँक ऑफ इंडिया बचत | ६७०१६६.२० |
| संस्था विकास व प्रसार निधी | २१३६१४७.६४ | र.जि.म.स. बँक करंट | ८४९१०.१० |
| सामाजिक कल्याण निधी | ४५२१५४०.०६ | शामराव विठ्ठल को-ऑप. बँक करंट | ७७३१.२३ |
| प्रशिक्षण कार्यक्रम व प्रगती निधी | २१३७२१३.०० | आयसीआयसीआय बँक करंट | ११४३१५५५.२७ |
| प्लेज्ड गोल्ड व्हॅल्यू चढउतार निधी | १०९५५१५५.०० | सारस्वत बँक करंट | ४१०५९.३२ |
| नवीन शाखा स्थिरता निधी | २१६९५२६.५० | सिंधुदुर्ग जि.म.स. बँक करंट | ८७१६.५० |
| न्यू टेक्नोलोजी फंड | २५८०७२६.०० | युनिटी स्मॉल फायनान्स बंक करंट | १९५६५.३२ |
| निवडणूक फंड | २९९४२५.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक करंट | ७७७४७.५० |
| व्याजदर चढ उतार निधी | ५०००००००.०० | एच.डी.एफ.सी. बँक करंट | २५०००.०० |
| सभासद आणि कर्मचारी कल्याण निधी | ४५३०००००.०० | | ३६०४०३८४.५३ |
| बिल्डींग फंड | २५००३५१३५.७५ | | |
| गुंतवणूक जोखीम व्यवस्थापन निधी | १००००००००.०० | **गुंतवणूक** | |
| | ५५६३९५१६३.४५ | र.जि.म.स. बँक गुंतवणूक | १३००१५२९९१.०० |
| | | **शेअर्स** | १५७२४९०.०० |
| **ठेवी** | | र.जि.म.स. बँक रिझर्व्ह फंड | १७५१५१७३३.०० |
| चालू ठेव | ७३६०६.०० | सारस्वत बँक गुंतवणूक | १२१११३२३४३.०० |
| बचत ठेव | ३२०४८५६९९.४४ | आयसीआयसीआय बँक गुंतवणूक | २६०५८९६१.०० |
| आवर्ती ठेव | २०१३३८५१.०० | टी.जे.एस.बी. बँक गुंतवणूक | २००३३३१५.०० |
| धनसंचय आवर्त ठेव | ३८९२२२६३.०० | सिंधुदुर्ग बँक गुंतवणूक | १०२७५०१८.०० |
| पिग्मी ठेव | ११९०२६९१६.२० | जनता सहकारी बँक गुंतवणूक | २००५३४२.०० |
| मासिक व्याज ठेव | १२९०४९७०९८.०० | बँक ऑफ महाराष्ट्र गुंतवणूक | २१३८२५३२.०० |
| अल्पमुदत ठेव | २२७०७३१२४९.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक गुंतवणूक | ५२१७२२३.०० |
| पुनर्गुंतवणूक ठेव | २८७०९४७३.०० | बँक ऑफ इंडिया गुंतवणूक | १००००००००.०० |
| मुदतपूर्ण ठेव | २५०८५९.५० | | १६९२९८१९४८.०० |
| | ४०८८८३१०१५.१४ | | |
| | | **कर्ज** | |
| तरतूद | | वैयक्तिक कर्ज | १२६४९२३६२.०० |
| बुडीत येणे निधी | २२५६४४४८.१० | वाहन कर्ज | ७४८९१४९०.०० |
| ग्रॅच्युईटी तरतूद | २०२२६७२७.०० | मालमत्ता कर्ज | ३९९१८२३०३.०० |
| ऑडीट फी तरतूद | १३६६१०९.५० | कॅश क्रेडीट | २६०१६०९९.३६ |
| लाभांश देणे तरतूद | २१८५७९०.०० | पिग्मी/मुदत/आवर्त ठेव तारण कर्ज | ११५१८३७३३.०० |
| सानुग्रह अनुदान तरतूद | १३००९३७.०० | सोनेतारण कर्ज | २२८१७७६८२१.०० |
| आकस्मिक खर्च तरतूद | ९३५६९२.०० | सोनेतारण सी.सी. | ३०३२५२९.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| म्युनिसिपल टॅक्स तरतूद | ४५२९.०० | | ३०२६५७५३३७.३६ |
| आऊटस्टँडिंग खर्च | ३४९५२१४.०० | | |
| उत्तम जिंदगी तरतूद | ७५८५०००.०० | **मालमत्ता** | |
| स्टेटयुटरी फॉर्मलिटी कंपलेशन फंड | १७५६८१६१.०० | इमारत जुनी | ९७११.०० |
| सोसायटी मेंटेनन्स फी तरतूद | १००००००.०० | इमारत नवीन | २५७९२०९५.८५ |
| क्लोजिंग अलौन्स निधी | ३६८१६६६.०० | फर्निचर व फिक्स्चार | ८९७३७९४.०७ |
| लोस असेट तरतूद | १००९४४०.०० | कॉम्प्यूटर | ६२४७७२.२९ |
| स्टाफ इन्सेंटिव्ह फंड | ३६४८२५८.०० | व्हेईकल | ३४०१३४६.०० |
| रिटायरमेंट बेनिफिट तरतूद | १४४९२६५.०० | लायब्ररी | ९८५१.०० |
| | ८८०२१२३६.६० | डेडस्टॉक | ६६९४१११.४० |
| | | पिग्मी मशीन | ३२७३.९४ |
| **इतर देणी** | | ऑनलाईन इन्व्हरटर | ८०३४८२.२६ |
| आऊटवर्ड बिल्स फॉर कलेक्शन | ९४३०००.०० | व्हेईकल टॅक्स येणे | २४०९०.०० |
| ओव्हरड्राफ्ट व्याज देय खाते | ८१०३२.०० | एअर कंडीशनर | २९१११८.६६ |
| कर्ज अनामत | ६४२६०.६५ | ऑफिस एक्विपमेंट | ६४४६२३.६७ |
| अनामत | ३९५२९६.५० | बिल्डींग साठी जागा | ३४४८००००.०० |
| देय व्याज | २६१४३२३.०० | बिल्डिंग अंडर कन्स्ट्रक्शन | २६६४०८४४.०४ |
| आउटपुट जीएसटी | १२०६५.०० | | १०८३९३११४.१८ |
| देय जीएसटी (आउटपुट) | २१४६०३.६६ | | |
| आउटपुट जीएसटी (आर.सी.एम.) | ३१२३५.६६ | **इतर येणी** | |
| RTGS NEFT सस्पेन्स खाते | ४११०.६० | ॲडव्हान्स | ४४२७६१.०० |
| बिल्डींग इसारा रक्कम | ४४००००.०० | टेलिफोन डिपॉझिट | १४६९९.०० |
| सिक्युरिटी डिपॉझिट (बिल्डींग) | ४४००००.०० | इलेक्ट्रिसिटी डिपॉझिट | ५४५०५.०० |
| | ५२३९९२७.०७ | टी.डी.एस. येणे | ९६७२९२१.०० |
| | | डेफर्ड रीव्हेन्यू | १९६११.०० |
| **बँक ओव्हरड्राफ्ट** | | प्रीपेड गोल्ड आणि कॅश इन्शुरन्स | ६०९०६६७.१६ |
| र.जि.म.स. बँक ओव्हरड्राफ्ट | ६७९५७१९.८१ | गुंतवणुकीवरील येणे व्याज | ७४९९०.०० |
| सारस्वत बँक ओव्हरड्राफ्ट | ६००००००.०० | सिक्युरिटी डिपॉझिट | ४६१०००.०० |
| | १२७९५७१९.८१ | प्रीपेड व्हेईकल इन्शुरन्स | ७१२६०.०० |
| | | ओ.बी.आर. | ९४३०००.०० |
| | | जीएसटी येणे (इनपुट) | ६००९१८.४८ |
| | | प्रीपेड वेब सर्विस खर्च | ६३९२८५.०० |
| | | प्रीपेड फास्ट टॅग | ७५४.०० |
| ओव्हरड्यू इंटरेस्ट रिझर्व्ह | ३२४८७२१.०० | | १९०८६३७१.६४ |
| | | | |
| | | एन.पी.ए. कर्जावरील येणे व्याज | |
| | | वैयक्तिक कर्ज | ११२८०५०.०० |
| सर्व शाखांचा एकत्रित मागील नफा | २८८१७०.१७ | मालमत्ता कर्ज | २१२०६७१.०० |
| | | | ३२४८७२१.०० |
| चालू नफा | १०९४२८६२३.४७ | | |
| **भांडवल व देणी** | ४८८६३२५८७६.७१ | **जिंदगी व येणी** | ४८८६३२५८७६.७१ |

# 'सहकार स्वरूपा' म्हणजे कोकणातील सहकाराचे अनुभवसिद्ध मॉडेल मांडणारे पुस्तक


## ॲड. दीपक पटवर्धन यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी डॉ. उदय निरगुडकर यांचे गौरवोद्गार



**रत्नागिरी :** 'सहकार चळवळ समाजाच्या पिरॅमिडच्या तळाशी असलेल्या घटकांना आत्मविश्वास देण्याचे काम करते. सहकार म्हणजे आधुनिक भारताचे लक्ष्मीसूक्त असून, 'सहकारातून समृद्धीकडे' हे भारताच्या अंत्योदयाचे सूत्र आहे. 'सहकार स्वरूपा' हे पुस्तक ॲड. दीपक पटवर्धन यांच्या ३५ वर्षांच्या संघर्षाची गाथा असून, कोकण ही सहकाराची भूमी आहे हे त्यांनी आपल्या वाटचालीतून सिद्ध केले आहे. ॲड. पटवर्धन यांनी सहकारासह ज्या क्षेत्रांत काम केले, तिथे त्यांनी अडचणी सोडवण्याचेच काम केले. त्यामुळे 'सहकार स्वरूपा' म्हणजे कोकणात राहून उत्तम काम करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणारे एक अनुभवसिद्ध पुस्तक आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ संपादक आणि ख्यातनाम वक्ते डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आणि रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी पतसंस्था, वाचक चळवळ आणि राजकारण या क्षेत्रांमध्ये केलेल्या मुशाफिरीवर आधारित असलेल्या 'सहकार स्वरूपा' या पुस्तकाचे प्रकाशन १७ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी रत्नागिरीत डॉ. निरगुडकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्यांनी ॲड. पटवर्धन यांच्या कार्याचे कौतुक करून, 'सहकार स्वरूपा' पुस्तकाचे वेगळेपण आणि महत्त्व यांविषयी विवेचन केले. प्रसिद्ध लेखक सुमेध वडावाला-रिसबूड यांनी या पुस्तकाचे शब्दांकन केले असून, प्रतिष्ठित अशा राजहंस प्रकाशनाने ते प्रकाशित केले आहे. प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ संपादक आणि चतुरस्र वक्ते डॉ. उदय निरगुडकर यांच्यासह स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे उपाध्यक्ष माधव गोगटे, रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालयाचे उपाध्यक्ष संतोष प्रभू, रत्नागिरी पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष संतोष थेराडे आणि रत्नागिरी आकाशवाणी केंद्राचे निवृत्त कार्यक्रम अधिकारी सुहास विद्वांस हे मान्यवर उपस्थित होते.




### ... तेव्हाच देश विश्वगुरू बनेल

डॉ. निरगुडकर यांनी या वेळी सहकार चळवळ देशाच्या प्रगतीसाठी कशी आवश्यक आहे हे अनेक उदाहरणांनी विशद केले आणि ॲड. पटवर्धन यांच्या कार्याचे महत्त्वही अधोरेखित केले. ते म्हणाले, 'सहकाराची चळवळ मजबूत होत नाही, तोपर्यंत देशाला विश्वगुरू बनता येणार नाही. 'वसुधैव कुटुम्बकम्' हे भारतीय संस्कृतीचे तत्त्व सहकार चळवळीतही आहे. यशवंतराव चव्हाण म्हणायचे, की 'सरकार चालवताना एक डोळा शेतीवर आणि एक डोळा उद्योगावर, तर नाक सहकारावर असले पाहिजे.' सहकार हे महाराष्ट्राचे नाक आहे आणि त्या नाकातील नथ म्हणजे स्वामी स्वरूपानंद पतसंस्था. बँकेचे काम संपते, त्याच्या खूप आधी आणि खूप नंतर पतपेढ्यांचे काम चालते.




सरकारही सहकारी क्षेत्रासाठी बरेच काही करते आहे. भारताने आयोजित केलेल्या जागतिक सहकार परिषदेत १०० उत्तम प्रकल्प मांडण्यात आले होते. चढ-उतार येत असतात; मात्र आपल्या ग्रामीण भागात सहकाराच्या जाळ्याची ताकद असल्याने आपण मोडून पडणार नाही. आपल्याकडे कम्युनिझम रुजत नाही, रुजणार नाही. कारण `कमाएगा वो खाएगा` हे कम्युनिझमचे सूत्र आहे; मात्र `कमाएगा वो खिलाएगा` ही आपली संस्कृती आहे.`

## नेतृत्वाची नीतिमत्ता महत्त्वाची

डॉ. निरगुडकर म्हणाले, `समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन समाजाच्या गरजा भागवण्याकरिता सुरू केलेली चळवळ म्हणजे सहकार. त्यात प्रतिस्पर्धी नसतो, तर सहकारी असतात; मात्र दुर्दैवाने आपल्याकडे राजकीय सोपान चढण्याची पायरी म्हणून सहकाराकडे पाहिले जाते. सहकार आणि राजकारण यांच्यातील अंतर कमी झाले आणि सहकार व राजकारण एकत्र आले, तर फक्त वैयक्तिक प्रगतीसाठी काम केले जाते. म्हणूनच नेतृत्वाची नीतिमत्ता ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यातूनच ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण होतो आणि एकदा ग्राहकाचा विश्वास मिळवला की जगातील कोणतीही डिस्काउंट स्कीम तो विश्वास तोडू शकत नाही, हे ॲड. पटवर्धन यांच्या उदाहरणावरून कळते. सहकार क्षेत्रात पश्चिम महाराष्ट्राची मक्तेदारी होती; मात्र कोकणातही सहकार चांगला फोफावू शकतो हे ॲड. पटवर्धन यांनी दाखवून दिले. त्रस्त, व्यस्त, सुस्त, स्वस्त अशा प्रकारची माणसे असतात; मात्र दीपक पटवर्धन हे त्यापेक्षा वेगळे असून, ते समस्या ओळखून त्यावर उपाय शोधणाऱ्या मस्त प्रवृत्तीचे व्यक्तिमत्त्व आहे. पत्नी अरुणाताई यांनी त्यांना दिलेली साथही तितकीच मोलाची आहे. यश आणि प्रसिद्धी कोणत्या मार्गाने मिळवली जाते हे महत्त्वाचे असून पटवर्धन यांनी नैतिकतेचे भान कायम ठेवले आहे. राजकारणात रमण्यापेक्षा समाजासाठी केलेले त्यांचे कार्य अधिक चिरस्थायी आहे.`




## पुस्तक अनेक भाषांमध्ये अनुवादित व्हावे

`सहकार क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी `सहकार स्वरूपा` हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. अभ्यासक्रमात जे शिकवले जात नाही, असे प्रत्यक्ष अनुभवलेले अनेक विषय यात मांडले आहेत. `आधी केले आणि मग सांगितले` या भूमिकेतून लिहिलेले हे अनुभवसिद्ध पुस्तक आहे. नीतिमान माणसे कशी गोळा करावीत आणि त्यांना केवळ पगार देऊन नव्हे तर संस्थेशी बांधील ठेवून कसे टिकवून ठेवावे, याचे मार्गदर्शन यात आहे. भारतात सहकाराचे जाळे गुजरात, महाराष्ट्र आणि काही प्रमाणात कर्नाटकात आहे. उर्वरित सर्व राज्यांमध्ये समृद्धी आणायची असेल आणि वंचितांच्या हाताला ताकद द्यायची असेल, तर `सहकार स्वरूपा` हे प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित असलेले पुस्तक अनेक भारतीय भाषांमध्ये निघाले पाहिजे,` अशी अपेक्षा डॉ. निरगुडकर यांनी व्यक्त केली.

# ध्रुवबाळाच्या गोष्टीतून प्रेरणा : अ‍ॅड. पटवर्धन

'सहकार क्षेत्रात मोठ्या संधी असून उद्योजकतेसाठी व्यापक जाळे उपलब्ध आहे. कोकणातील युवकांनी सहकाराकडे नव्या दृष्टीने पाहावे,' असे आवाहन अ‍ॅड. पटवर्धन यांनी केले. ते म्हणाले, 'माझा ३५ वर्षांचा प्रवास या पुस्तकातून शब्दबद्ध झाला आहे. मला अनेक ठिकाणी आणि प्रामुख्याने सहकार क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. कोकणामध्ये सहकार क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनेकदा नकारात्मक असतो. अशा परिस्थितीत केवळ १० हजार रुपये हातात असताना केलेली सुरुवात आज ७०० कोटी रुपयांपर्यंत नेता आली. ३०० सभासदांच्या एका छोट्या ग्रुपपासून सुरू झालेला हा प्रवास ४९ हजार सभासदांपर्यंत पोहोचला आहे. रत्नागिरी तालुक्यापुरते मर्यादित असलेले स्वरूपानंद पतसंस्थेचे कार्यक्षेत्र आज संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले आहे. ज्या हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशनमध्ये मी केवळ ७०० रुपयांवर काम केले, त्याच संस्थेचा




१० वर्षे संचालक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. हे सांगण्याचा उद्देश हाच आहे, की सहकार क्षेत्रात नेतृत्व आणि उद्योजकतेच्या खूप मोठ्या संधी दडलेल्या आहेत. कोकणातील तरुणांनी या संधी साध्य कराव्यात, यासाठी माझ्या अनुभवांचे कथन या पुस्तकात केले आहे.'

'शिक्षिका असलेली माझी आई लहानपणी माझ्याकडून दररोज संध्याकाळी शुभंकरोती आणि श्लोक म्हणवून घ्यायची. मी तिला नेहमी ध्रुवबाळाची गोष्ट सांगायला सांगायचो. कदाचित त्या ध्रुवबाळाच्या गोष्टीचा माझ्या मनावर असा परिणाम झाला, की ज्या ज्या संस्थांमध्ये मी काम सुरू केले, तिथे प्रदीर्घ काळ सातत्याने यशस्वीपणे काम करू शकलो. हा माझ्यावर झालेला संस्कार आहे. या पुस्तकातील प्रत्येक अनुभव खरा आहे. त्यातील प्रयत्न प्रामाणिक आहेत. सहकार, नगर वाचनालय, जिल्हा बँक किंवा राजकीय क्षेत्रातील कामात अनेक चढ-उतार आले; पण सकारात्मकता जपून पुढे जाण्याचा मी प्रयत्न केला. सुरुवातीला लोकांनी माझ्या वडिलांकडे तक्रारी केल्या होत्या, की "चांगली नोकरी सोडून मुलगा हे काय उद्योग करतोय?" कारण तेव्हा सहकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होता; पण आई-वडिलांच्या पाठिंब्यामुळे आज स्वरूपानंद पतसंस्थेचे एक मोठे अर्थविश्व निर्माण झाले आहे. रत्नागिरीकरांनी माझ्या पाठीशी उभे राहून जी साथ दिली, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे,' असेही अ‍ॅड. पटवर्धन यांनी सांगितले.

कोकणात वाढत्या वृक्षतोडीमुळे डोंगर बोडके होत आहेत. त्यामुळे सहकाराच्या माध्यमातून वनराया आणि देवराया उभ्या करण्याची गरज आहे, असे मतही डॉ. निरगुडकर यांनी व्यक्त केले.

## मार्गदर्शक आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व

या वेळी संतोष थेराडे यांनी अ‍ॅड. पटवर्धन यांच्या संस्थात्मक कार्याचा आढावा घेऊन डॉ. निरगुडकर यांचा परिचय करून दिला आणि मान्यवरांचा सत्कार केला. अ‍ॅड. पटवर्धन यांच्या सूनबाई सौ. अंकिता वैभव पटवर्धन यांनी सांगितले, की 'बाबांच्या आत्मकथनाचा हा सोहळा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. संघर्षातून यश मिळवून इतरांना प्रेरणा देणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आम्हाला नेहमीच मार्गदर्शक ठरले आहे.'

सुहास विद्वांस म्हणाले, 'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा केवळ दहा हजार रुपयांपासून सुरू झालेला प्रवास आज सातशे कोटींपर्यंत पोहोचला आहे. कोकणात सहकाराची पायाभरणी करणारे दीपक पटवर्धन हे दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व आहे. संस्थेत सोनेतारणासाठी स्वतंत्र कक्ष ठेवणे ही संवेदनशीलता हे त्यांचे वेगळेपण आहे. ठेवीदारांच्या पैशांची काटेकोरपणे काळजी घेणारे असे नेतृत्व दुर्मीळ असते.'

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. पूर्वा पेठे यांनी केले. ज्येष्ठ नेते राजाभाऊ लिमये, डॉ. बा. सा. कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. श्रीरंग कद्रेकर, ख्यातनाम उद्योजक दीपक गद्रे, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. कल्पना मेहता यांच्यासह रत्नागिरीतील विविध क्षेत्रांमधील नामवंत व्यक्ती आणि रसिक श्रोते कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.





# 'गोवा शिपयार्ड लिमिटेडमध्ये कामाची संधी हे भाग्य'

**ज्यांच्या नेतृत्वाखाली आर्थिक शिस्त ही स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची खास ओळख बनली आहे आणि पतसंस्थेने उत्तरोत्तर प्रगती केली आहे, ते ॲड. दीपक पटवर्धन यांनी गोवा शिपयार्ड लिमिटेड या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीचे स्वतंत्र संचालक म्हणून चार वर्षे जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडली. ऑडिट समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. त्यांचा कार्यकाळ नुकताच संपला. त्या निमित्ताने, त्यांनी व्यक्त केलेल्या भावना...**

गोवा शिपयार्ड लिमिटेड या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीला नवरत्न वर्गात स्थान मिळावे, हा प्रस्ताव पारित करून माझा कार्यकाळ संपत असताना रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड येथे गोवा शिपयार्ड लिमिटेड कंपनीचा प्रकल्प मंजूर झाला आहे. गोवा शिपयार्ड लिमिटेड या कंपनीच्या 'बोर्ड ऑफ डायरेक्टर'मध्ये केंद्रीय कॉर्पोरेट अफेअर विभागाने माझी स्वतंत्र संचालक म्हणून २०२२मध्ये नियुक्ती केली. तो तीन वर्षांचा कार्यकाळ २०२५मध्ये संपल्यानंतर एक वर्षासाठी फेरनियुक्ती करण्यात आली. अशा कंपन्यांवर फेरनियुक्तीची संधी सहसा मिळत नाही; पण ते भाग्य माझ्या नशिबी आले.

शिपयार्ड क्षेत्रात गोवा शिपयार्ड लिमिटेड कंपनी १९५७पासून कार्यरत आहे; पण पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी आल्यावर गोवा शिपयार्ड लिमिटेडला ऊर्जितावस्था आली. कोस्ट गार्ड, भारतीय नौदल यांसाठी विविध प्रकारच्या नौका बनवण्याचे काम गोवा शिपयार्ड लिमिटेड ही कंपनी करते. संरक्षण मंत्रालयाच्या आधिपत्याखाली हे काम चालते.

### जयगडला प्रकल्प मंजूर

माझ्या स्वतंत्र संचालक पदाच्या काळात गोवा शिपयार्ड लिमिटेड कंपनीचा जयगडनजीक २५०० कोटींचा प्रकल्प उभारण्याचा निर्णय झाला. या महत्त्वपूर्ण घटनेच्या निर्णयप्रक्रियेवेळी मी संचालक मंडळात सदस्य होतो. आपल्या गावानजीक इतका मोठा प्रकल्प येत असताना त्या निर्णयप्रक्रियेत सहभाग असण्याच्या समाधानासारखेदुसर समाधान नाही. माझ्या या कार्यकाळात आणखीही काही महत्त्वाचे टप्पे गोवा शिपयार्ड लिमिटेडने पार केले.

यापूर्वी गोवा शिपयार्ड लिमिटेड ही बी कॅटेगरी स्टेटसची कंपनी होती; पण गेल्या चार वर्षांत उत्तम कामगिरी केल्यामुळे मार्च २०२६पासून गोवा



शिपयार्ड लिमिटेड कंपनी ए कॅटेगरी स्टेटसमध्ये वर्ग झाली. हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. आता कंपनीची कामगिरी सतत उत्तम राहिल्याने, नवरत्न कॅटेगरीमध्ये कंपनीची गणना व्हावी म्हणून असलेल्या अटी पूर्ण झाल्याने संचालक मंडळात या प्रस्तावाला मान्यता देऊन संबंधित विभागाला प्रस्ताव पाठवण्यासाठी मंजुरी देण्यात आली. कंपनी नवरत्न वर्गात समाविष्ट होणे हा अभिमानाचा विषय ठरेल. त्यातही रत्नागिरीत कंपनी चालू होताना ती नवरत्न कंपनी म्हणून केंद्र शासनाने मान्य केलेली असेल याचा आनंद खूप मोठा आहे.

गोवा शिपयार्ड लिमिटेड कंपनीची २०२१-२२पासून गतीने प्रगती होत आहे. रेव्हेन्यू फ्रॉम ऑपरेशन्स (महसूल) ७४० कोटी रुपयांवरून २८५१ कोटी झाला. कंपनीने 'व्हॅल्यू ऑफ प्रॉडक्शन'मध्ये गेल्या चार वर्षांत तिप्पट वाढ नोंदवली. आज ते मूल्य अंदाजे ३५०० कोटी झाले आहे. कंपनीचा टॅक्सनंतरचा नफा (करोत्तर) १०१ कोटी रुपयां वरून ३०० कोटींच्या पलीकडे गेला. 'नेट वर्थ'मध्ये (निव्वळ संपत्ती) ४१ टक्क्यांनी वाढ होऊन ती २००० कोटी रुपयां पलीकडे गेली. कंपनीची ऑर्डर बुक पोझिशन नजीकच्या कालावधीत ३२ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल.

२०२४-२५ पासून दर ४२ दिवसांनी एक जहाज जलावतरणासाठी तयार होत आहे, इतक्या वेगाने काम सुरू आहे. आमच्या २०२२पासून २०२६पर्यंतच्या काळात झालेली ही प्रगती खूप काही सांगून जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे मिशन देऊन स्वतंत्र संचालक म्हणून आम्हाला कंपनीमध्ये पाठवले, ते मिशन यशस्वी होताना आपला सक्रिय सहभाग देता आला, संरक्षण क्षेत्राशी जोडले जाता आले, यापेक्षा जीवनात अधिक काय हवे?

चार वर्षे ऑडिट समितीचा अध्यक्ष म्हणून काम केले. गोवा शिपयार्ड लिमिटेडचे ऑडिट रिपोर्ट, त्यातील त्रुटींची पूर्तता पाहणे, ऑडिट रिपोर्टची संचालक मंडळाला शिफारस करणे, कंपनीच्या हजारो कोटींच्या गुंतवणुका तपासणे, त्या धोरणातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आहेत का हे पाहणे आणि त्यानुसार त्या शिफारस करणे, वेगवेगळ्या विभागासाठी ऑडिटरची नियुक्ती करणे, कंपनीची ऑडिटेड आर्थिक पत्रके व अहवाल यांचा अहवाल शिफारस करणे अशी अनेक महत्त्वाची आणि आव्हानात्मक कामे ऑडिट समिती करत असते. रिस्क मिटिगेशन प्लॅनही (जोखीम कमी करण्याचे नियोजन) मंजूर करून शिफारस करण्याचे काम ऑडिट समिती करते. या समितीच्या शिफारशीशिवाय अनेक विषय बोर्ड मीटिंगमध्ये ठेवता येत नाहीत, इतकी ही समिती महत्त्वाची असते. अशा समितीवर मला चार वर्षे काम करता आले.

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) समितीचा सदस्य होतो, तेव्हा त्या माध्यमातून सुमारे एक कोटी रुपयांचा विकासनिधी रत्नागिरीत आणता आला. पर्चेस (खरेदी) समितीमध्ये काम करता आले, हा तर खूप मोठा अनुभव होता. ब्राह्मोससारखे क्षेपणास्त्र, अनेक प्रकारची रडार, शिपचे गीअर, मोठ्या प्रमाणात स्टील, अनेक अतिमौल्यवान उत्पादने या समितीमार्फत मंजूर होतात. त्याची पद्धत समजली. परदेशांशी करार कसे होतात, मोनोपॉली असलेल्या कंपन्यांशी कसे डील करावे लागते, अटी-शर्ती कशा असतात, यात स्वदेशी उत्पादने (इंडिजिनस प्रॉडक्ट) तयार करताना संशोधन-विकास विभागाची (आर अँड डी) भूमिका कशी असते, अशा अनेक आव्हानात्मक, थ्रिलिंग गोष्टी कळल्या. संरक्षण क्षेत्रातील मशिनरी, क्षेपणास्त्रे आदींच्या खरेदी ऑर्डरसाठी माझी सही कामी आली, हे भाग्यच! सुदैवाने सर्व ऑर्डर्स नौदल, तटरक्षक दल (कोस्टगार्ड) यांच्या असल्याने पारदर्शकता होती. अशा अनेक निर्णयप्रक्रियांमध्ये थेट सहभाग घेता आला. कॉर्पोरेट जगत कसे काम करते, ते कळले. त्यातही आमचा कार्यकाळ गोवा शिपयार्ड लिमिटेडच्या इतिहासातील अत्यंत यशस्वी ठरला.

गोवा शिपयार्ड लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) ब्रजेश कुमार उपाध्याय यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आम्हा दोन्ही स्वतंत्र संचालकांना धन्यवाद दिले. 'गोवा शिपयार्ड लिमिटेड परिवार आपल्याला कधीही विसरणार नाही. तुम्ही या कंपनीत भाग्य घेऊन आलात. कंपनीचे भाग्य उजळले,' या शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. वरिष्ठ अधिकारी आणि ऑफिशियल संचालक यांच्या वतीने कंपनी सेक्रेटरींनीही आपल्या उत्कट भावना व्यक्त केल्या. **(पान १४ वर...)**

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# नेहमीप्रमाणेच ठेववृद्धी मास योजनांना चांगला प्रतिसाद

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेत दर वर्षी तीन ठेववृद्धी मास आयोजित केले जातात. त्या माध्यमातून पतसंस्थेच्या ठेवींमध्ये मोठी भर पडते. आर्थिक वर्षातील पहिला ठेववृद्धी मास २० जून ते २० जुलै या कालावधीत असतो. दसरा-दिवाळी कालावधीत दुसरी ठेव योजना असते, तर एक ते ३१ जानेवारी या कालावधीत नववर्ष स्वागत ठेव योजना असते. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील पहिल्या ठेववृद्धी मासात म्हणजे २० जून ते २० जुलै २०२५ या कालावधीत २७० नव्या ठेवखात्यांच्या माध्यमातून पतसंस्थेत ३० कोटी पाच लाख रुपयांच्या ठेवी संकलित झाल्या. तो एक उच्चांक होता. तत्पूर्वी एका ठेववृद्धी मासात १८ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्याचा उच्चांक होता.

२२ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दसरा-दिवाळी ठेव योजना राबवली गेली. त्यामध्ये ४९३ नव्या खात्यांच्या माध्यमातून साडेआठ कोटी रुपयांच्या ठेवी पतसंस्थेत जमा झाल्या. एक जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत राबवलेल्या नववर्ष स्वागत ठेव योजनेत पतसंस्थेच्या एकंदर ठेवींनी ४०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. या महिन्यात पतसंस्थेत ६३५ ठेवखात्यांच्या माध्यमातून आठ कोटी पाच लाख रुपयांच्या ठेवी नव्याने संकलित झाल्या. म्हणजेच या तीन ठेववृद्धी मासांमध्ये मिळून जवळपास ४६ कोटी ६० लाख रुपयांच्या ठेवी पतसंस्थेत संकलित झाल्या. नेहमीप्रमाणेच ग्राहक सभासद आणि ठेवीदारांनी पतसंस्थेवर विश्वास दाखवून ठेवी ठेवल्याने हा मोठा टप्पा गाठता आला आहे, अशी भावना पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी व्यक्त केली आहे. तसेच, आता सुरू झालेल्या नव्या आर्थिक वर्षातील ठेववृद्धी मासांनाही असाच उत्तम प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. या वर्षातील पहिला ठेववृद्धी मास २० जून ते २० जुलै या कालावधीत होणार आहे.

---

# 'गोवा शिपयार्डमध्ये कामाची संधी हे भाग्य'

**(पान १३ वरून)** गोवा शिपयार्ड लिमिटेडचे स्मृतिचिन्ह व शाल देऊन आम्हाला निरोप देण्यात आला.

गोवा शिपयार्ड लिमिटेडचा संचालक म्हणून काम करण्याची संधी, त्यातही निर्णय घेणाऱ्या मंडळामध्ये काम करता येणे आणि त्यातही दुसऱ्यांदा अपवादात्मक मिळणारी संधी मला प्राप्त झाली, या सगळ्याच गोष्टी भाग्याच्या आहेत. भाजपचे तत्कालीन प्रदेश पदाधिकारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि 'कॉर्पोरेट अफेअर्स' पाहणारी टीम, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काही पदाधिकारी यांनी दिलेली ही संधी, त्यांनी दर्शवलेला विश्वास सार्थ ठरवला आणि गोवा शिपयार्ड लिमिटेड कंपनीला अग्रेसर करून आपले दायित्व पार पाडून हा कार्यकाळ पूर्ण करताना मनाला खूप कृतार्थ वाटत आहे.

**– ॲड. दीपक पटवर्धन**



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेत दर वर्षीप्रमाणे सत्यनारायण पूजा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी जिल्हा सहकार उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी संस्थेला भेट दिली.



श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) येथील सिद्धिविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष वासुदेव काळे यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली.



देऊड येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालयातर्फे ॲड. दीपक पटवर्धन यांचा सन्मान करण्यात आला.



न्यू इंडिया ॲश्युरन्सचे मॅनेजर अमित शर्मा आणि अधिकारी ओंकार धोंड यांनी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला भेट दिली.



वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित छत्रपती संभाजीनगर - या पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. शांतीलाल शिंगी यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली.

# 500 कोटी ठेवींचे

## स्वप्न नव्हे... हा संकल्प आहे!

### ३१ मार्च २०२६ अखेर आर्थिक आढावा

हिशेबात "स्पष्टता"
३५ वर्षांची कटिबध्दता!

| | |
|---|---|
| ठेवी : | ४०८ कोटी ८८ लाख |
| कर्ज : | ३०२ कोटी ६५ लाख |
| वसुलीचे प्रमाण : | ९९.८२ % |
| निव्वळ नफा : | १० कोटी ९४ लाख |
| स्वनिधी : | ५५ कोटी |
| गुंतवणूक : | १६९ कोटी २९ लाख |
| सी.डी.रेशो : | ६५.०१ % |
| नेट एन.पी.ए. : | 0 % |



सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांना मन:पूर्वक धन्यवाद!

– ॲड. दीपक पटवर्धन (अध्यक्ष)

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था

मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.

मो. नं. 9403 506 363

www.swaroopanandpatsanstha.com